## प्रकरण - पाचवे

# उपसंहार

"सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला होता. या संशोधन प्रबंधामध्ये एकूण चार प्रकरणांचा आढावा घेण्यात आला आहे. चार प्रकरणांतून सोलापूर शहराचा इतिहास, धर्म व पंथ, शहरातील धार्मिक स्थळे आणि धार्मिक स्थळांचा लोकजीवनावरील पडलेला प्रभाव इत्यादि घटकांवर प्रकाश टाकला असून त्याचे समग्रपणे विवेचन प्रस्तुत प्रकरणातून केलेले आहे. ही मांडणी करताना धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्य व कला या मुद्यांना अनुसरून संशोधनाची फलिते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटकच्या सीमेवर असल्याने याठिकाणी मराठी, तेलगु आणि कन्नड संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. मध्यकाळात मुस्लिम सत्ताधिशाबरोबर आणि व्यवसायाच्या निमित्ताने अनेक मुस्लिम लोक सोलापूर शहरात कायमचे स्थिरावले त्यामुळे इस्लामी संस्कृतीचे ही अस्तित्त्व शहरात आढळून येते. विविध जाती-धर्मांचे लोक शहरात राहतात त्यांच्या धार्मिक समजूती, धार्मिक स्थळांतील विविधता, चालीरिती, रूढी, परंपरा, सण, उत्सव इत्यादी घटकांमध्ये विविधता असली तरीही शहरातील लोक धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक संकटाच्या प्रसंगी संघटीत होतात.

१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत शहरातील विविध जाती-धर्मांच्या लोकांनी हिरिरीने भाग घेतला होता. त्यामध्ये अनेकांनी आपल्या प्राणांची आहूती दिली. सोलापूरात संक्रातीनिमित्त ग्रामदैवत श्री सिध्देश्वराची यात्रा भरते. काठ्यांचा सोहळा हा या यात्रेतील अपूर्व सोहळा मानला जातो. १२ जानेवारी हा यात्रेचा पहिला दिवस असून या दिवशी पहिली काठी धरण्याचा मान मल्लप्पा धनशेट्टी यांचा होता. हा दिवस हेरुनच १२ जानेवारी १९३१ या दिवशी ब्रिटिशांनी शहरातील जगन्नाथ शिंदे, मल्लप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन आणि किसन सारडा या चौघांना येरवडा तुरूंगात फासावर लटकाविले होते.

माणसाच्या जीवनात धार्मिक स्थळास अथवा देवालयास अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही देवालये सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका बजावतात. सामाजिक

रूढी, परंपरा व वारसा जपून ठेवण्याचे कार्यही धार्मिक स्थळे करीत आहेत. धार्मिक स्थळांच्या माध्यमातून भजन, कीर्तन, प्रवचने आयोजित केली जातात. त्यामुळे वाङ्मयीन व कलात्मक मूल्यांचे जतन तर होतेच पण त्याचबरोबर आचार-विचारांचे व संस्कृतीचे अभिसरण घडून येते. अशा या धार्मिक स्थळांमध्ये प्रस्थापित धर्मस्थळे आणि लोकदैवते इत्यादींचा समावेश होतो. प्रस्थापित प्रमुख धर्माशी संबंध नसलेली पण विशिष्ट लोकसमुहाने श्रध्देने आपली मानलेली दैवते ही लोकदैवते होत. धार्मिक जीवनाला देव-देवतांच्या पूजे-अर्चेतून अभिव्यक्ति प्राप्त होते. माणसाना भक्ती करण्यासाठी प्रतिकाची आवश्यकता असते. या भक्तीच्या अविष्कारातून अनेक देवालयाची निर्मिती झाली. त्यामध्ये प्रत्येक देवाचे स्वरूप व पूजा पध्दती भिन्न भिन्न आहेत. प्रस्थापित धार्मिक स्थळांबरोबर शहरात असणाऱ्या पारंपारिक लोकदैवताचा अभ्यास आजपर्यंत कोणीही केला नाही. म्हणून "सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रबंधातील पहिले प्रकरण हे सोलापूर शहराचा इतिहास असे असून या प्रकरणाचा अभ्यास केला असता पुढील घटक निदर्शनास आले. सोळा गावांचे एकत्रीकरण होऊन 'सोलापूर' हे नांव या शहरास मिळाले असावे असे वाटते. शहरातील कापड गिरण्यातून काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढल्याने हे शहर कामगारांचे शहर म्हणूनही ओळखले जाऊ लागले. कापड गिरण्या सुरू झाल्याने शहराच्या आर्थिक विकासाबरोबर सांस्कृतिक विकास होण्यास मदत झाली. प्रकरणाच्या पुढील भागात शहराचे कसबा आणि जुने शहर, पेठा, वेशी, नगरपालिकेची स्थापना, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची निर्मिती, धर्मवार लोकसंख्या, भाषिक व सांसकृतिक ऐक्य व प्रभाव अशा विविध घटकांचा विचार करण्यात आला असून येथे मराठी कानडी आणि तेलगू असा त्रिवेणी सांस्कृतिक समन्वय साधलेला दिसून येतो. यामुळेच या शहराचे धर्मिक दृष्टीकोणातून एक वेगळेपण निर्माण झाल्याचे दिसून येते.

प्रकरण दोनमध्ये शहरात अस्तित्त्वात असणाऱ्या विविध धर्म आणि पंथ व उपपंथावर प्रकाश टाकण्यात आला असून या प्रकरणात धर्माच्या पारंपारिक व्याख्याबरोबर अलिकडील काळातील विचारवंतानी केलेल्या व्याख्या दिल्या आहेत. शहरातील धार्मिक जीवनात प्रामुख्याने हिंदू, इस्लाम, जैन, बौध्द, ख्रिश्चन, शीख व पारशी इत्यादी धर्मांचा समावेश आहे. धर्म या संकल्पनेत विधीयुक्त

क्रिया-कर्म, ईश्वरोपासना, परमेश्वर प्राप्तीची साधने, मार्ग किंवा पंथ, परंपरेने चालत आलेले आचार-विचार आणि कर्तव्य इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. हिंदू धर्मात अनेक पंथ व उपपंथ असून शहरात वारकरी, लिंगायत आणि दत्त सांप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून आले. या संप्रदायाप्रमाणेच नाथ आणि नागेश संप्रदायाचे अस्तित्त्व शहरात असले तरी त्याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला नाही.

या विविध पंथातील पुजा-अर्चा, परमेश्वराविषयी असलेल्या कल्पना व तत्त्वज्ञान इत्यादीबाबतीत बरेचशे साम्य दिसून येते. परंतु विविध उपपंथाचे आचार-विचार, बाह्य वेश व पंथ प्रसाराच्या पध्दती वेगवेगळ्या असल्या तरी या पंथ-उपपंथावर प्राचीन धर्म शास्त्रीय ग्रंथांचा व त्यातील विचारांचा प्रभाव दिसून येतो. इस्लाम धर्मात सिय्या व सुन्नी असे दोन उपपंथ अस्तित्त्वात आहेत. सुन्नी पंथीय दिवसातून पाच वेळा व सिय्या दिवसातून तीन वेळा नमाज अदा करतात. इस्लाममध्ये पाच अध्यात्मिक अधिष्ठाने ही माणसाच्या अध्यात्मिक प्रगतीचे पाच टप्पे मानले असून, पाच आचार तत्त्वांनाही महत्त्व आहे. शहरातील सिय्या आणि सुन्नी पंथी यांची आचार तत्त्वे, विचारप्रणाली यामध्ये थोड्या फार प्रमाणात फरक जाणवतो.

शहरातील जैन धर्मीय समाज हा श्वेतांबर आणि दिगंबर पंथामध्ये विभागलेला असून त्यांची धार्मिक स्थळे वेगवेगळी आहे. सण व उत्सव, पूजाविधी यामध्ये सारखेपणा आहे. जैन धर्मात संस्कारांना विशेष महत्त्व असून ते पर्युषणपर्व, चातुर्मास, चैत्र पोर्णिमा, वर्षप्रतिपदा, भाद्रपद उत्सव इत्यादी सण-उत्सव साजरे करतात. जैन समाजातील विविध स्त्री-पुरूषांनी धार्मिक साहित्याचे लिखाण करून शहराच्या धार्मिक इतिहासात भर घातली आहे. बौध्द, शिख आणि पारशी व ख्रिश्चन धर्मीय लोक ही शहरात आपापल्या धर्माप्रमाणे धर्माचरण करताना दिसून येतात.

तिसऱ्या प्रकरणात सोलापूर शहरातील विविध धर्मीयांच्या धार्मिक स्थळांचा सविस्तर अभ्यास केला असता असे दिसून आले की, निरनिराळ्या राज्यातील धर्म व संस्कृतिनुसार धार्मिक स्थळे उभारलेली आढळतात. त्यामध्ये हिंदू देवतांची मंदिरे, लोकदेवतांची मंदिरे, मुस्लिमांच्या मशिदी, दर्गे, ईदगाह, ख्रिश्चनांचे चर्च, जैन, बौद्ध, पारशी, शीख इत्यादिंची धार्मिकस्थळे दिसून येतात. याठिकाणी धार्मिकस्थळांची बांधकाम पद्धती, पुजा-अर्चा, देवतांची यात्रा, उत्सव, नित्यपूजा व

वार्षिक पूजा तसेच मूर्तीचे स्वरुप इत्यादी घटक विचारात घेतले आहेत. मंदिरातून व मठातून होणारे प्रवचन, किर्तन, व्याख्याने यासारख्या कार्यक्रमांतून वैचारिक अभिसरण घडून आल्याचे दिसून येते.

मध्ययुगीन कालखंडात शहरात मुस्लिमांची कांही धार्मिक स्थळे व पेठांची निर्मिती झाली आहे. त्यामध्ये आदिलशाही काळातील बत्तीस खांबी मशिद, काळी मशिद, जामा मशिद, औरंगजेबकालीन पानगल ईदगाह, शहाजौहरवली दर्गा आणि बेगम पेठ व पाच्छा पेठ इत्यादींचा त्यात समावेश होतो. अशा या धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने मुस्लिम बांधव आपला नमाज अदा करतात व त्याचबरोबर बकरी ईद, रमजान ईद, पैगंबर जयंती इत्यादी सण व पीरांचे उरूस साजरे करतात.

उत्तरेतून दक्षिण भारताकडे जाताना अनेक जैन मुनी सोलापूर शहरास भेट देत. त्यांच्याबरोबर गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेशातून आलेले अनेक श्रावक सोलापूर शहरात स्थायिक झाले आहेत. जैन मुनींच्या उपासनेसाठी त्यांनी शहरात जैन मंदिराची स्थापना केली. जैनांची प्रसिध्द तेरा मंदिरे असून दहा दिगंबर पंथीय आणि तीन श्वेतांबर पंथीय आहेत. श्वेतांबर पंथीयांची नऊ वैयक्तिक मंदिरेही शहरात आहेत. या मंदिरातून महावीर जयंती, अक्षय तृतीया, चातुर्मास, दिवाळी, अष्टानिकपर्व, पर्यूषणपर्व इत्यादी जैन समाजाचे सण उत्सव साजरे केले जातात. यावेळी अनेक जैन मुनी व साधू मंदिरांना भेटी देऊन जैनाचे आचार, तत्त्वे यावर भाष्य करतात. दिगंबर पंथीय जैन मंदिरे मानस्तंभावरून ओळखली जातात.

शहरात बौध्द धर्मीयांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने अनेक बौध्द विहारांची निर्मिती झाली आहे. त्यामध्ये मिलींद नगर बौध्द विहार, अस्थी विहार, राजागृह बुध्द विहार, प्रबुध्द भारत बुध्द विहार, बुध्ददर्शन बुध्द विहार इत्यादी बुध्द विहारांचा त्यात समावेश होतो. या बौध्द विहारांमध्ये दररोज बुध्दवंदना केली जाते. बुध्द जयंतीला शहरातील बौध्द धर्मीय लोक या विहारांमध्ये दर्शनासाठी गर्दी करतात. या बौध्द विहारांमध्ये अनेक बौध्द भिख्खु प्रवचन देण्यासाठी बाहेरून येतात. शहर व जिल्ह्यात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी सुरूवातीच्या काळात पहिली ख्रिस्ती मंडळी ही मिशन स्थापन केली गेली. पुढील काळात प्रोटेस्टंट आणि कॅथॉलिक पंथीय लोकही शहरात आले. त्यांनीही आपापली चर्चेस निर्माण केली. मेथॉडिस्ट चर्च, प्रोटेस्टंट चर्च, अमेरिकन मराठी मिशन, पेंटीकॉस्टल चर्च इत्यादी चर्चच्या माध्यमातून ख्रिश्चनांनी आपल्या धर्माची तत्त्वे व

विचार प्रणाली शहरात रूजविण्याचा प्रयत्न केला. नाताळ, गुडफ्रायडे सारखे सण साजरे करतात. तसेच रविवारी वेगवेगळ्या चर्चमध्ये ख्रिश्चन बांधव एकत्रित येऊन येशुची प्रार्थना करतात.

पारशी धर्मीयांचे प्रार्थना स्थळ 'अग्यारी' हे शहराच्या लष्कर भागात असून त्याठिकाणी मोबेद हा पुजा-अर्चा व इतर धार्मिक विधी करतो. अग्यारीमध्ये अखंड दिवा तेवत ठेवलेला असतो. शीखांचे अस्तित्त्व शहरात असल्याने अलिकडच्या काळात त्यांनी गुरूद्वाराची निर्मिती केलेली आहे. धार्मिक स्थळांचा अभ्यास केला असता इतर धर्मीयांच्या धार्मिक स्थळांच्या तुलनेत शिख व पारशी समाजाची धार्मिक स्थळे कमी प्रमाणात दिसून येतात. ही धार्मिक स्थळे धर्म, संस्कृति, शिक्षण, पशू संवर्धन, इतयादि सारख्या समाजोपयोगी घटकांशी संबंधित असलेली दिसून येतात. धार्मिक स्थळांच्या उत्सवाच्या निमित्ताने संस्कृति, समन्वयाप्रमाणेच आर्थिक देवाण घेवाणही होताना आढळते.

धार्मिक स्थळांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव या चौथ्या प्रकरणात सोलापूर शहरातील धार्मिक जीवन, धर्मांतर प्रक्रिया, धार्मिक ऐक्य, धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने होणारे सण व उत्सव, धार्मिक कार्यात शहरातील महिलांचा सहभाग आणि धार्मिक स्थळांचा सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावर पडलेला प्रभाव व त्या अनुषंगाने घडून आलेले अभिसरण यावर प्रकाश टाकला आहे. आपापल्या धर्म संस्काराप्रमाणे प्रत्येक धर्मीयांना वर्तन करण्याची परवानगी असली तरीही इतर धर्मीयांच्या बाबतीत सहिष्णुवृत्ती असल्याचे दिसून आली. शहरातील हिंदु आणि मुस्लिम पंथीयांचे उत्सव दोन्ही धर्मातील लोक आनंदाने एकत्रितपणे साजरे करतात. धार्मिक चालीरिती, आचार-विचार, रूढी, परंपरा, सामाजिक संस्था, श्रध्दा, मूल्यनिष्ठा इत्यादींचा समावेश संस्कृतीच्या अध्यात्मिक अंगामध्ये होतो. अशा संस्कृतीच्या जडण-घडणींमध्ये धार्मिक स्थळांचा प्रभाव दिसून येतो. शहरातील मराठी, कानडी, तेलगु, उर्दू इत्यादी भाषा बोलणाऱ्या लोकांच्यावर वेगवेगळ्या धार्मिक स्थळांचा प्रभाव पडलेला असल्याने त्यांच्यात आचार-विचार, अन्न, वस्त्र, बोलीभाषा, सण-समारंभ, विविध संस्कृत्यांचा संगम इत्यादी घटकांमधून धार्मिक व सांस्कृतिक ऐक्य दिसून आले.

प्रस्तुत प्रकरणात विविध सण, उत्सवावर धार्मिक स्थळांचा कसा प्रभाव जाणवतो हे विचारात घेतले असून धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने महिलांच्या धार्मिक, सामाजिक आणि साहित्यिक कार्याचाही आढावा घेण्यात आला आहे. त्याचबरोबर धार्मिक स्थळांना मिळणारी अनुदाने, इनामे, देवस्थान कर, धर्मादाय कर या अनुषंगांनी होणारी आर्थिक उलाढाल, त्यातून धार्मिक स्थळांची

होणारी देखभाल आणि तत्कालीन राज्यकर्त्यांचा धार्मिक स्थळांबाबतचा दृष्टीकोन, याचाही अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

## निष्कर्ष

सोलापूर शहर हे मुंबई - मद्रास रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून ते महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाच्या सीमेवर वसले असल्याने येथे मराठी, कानडी आणि तेलगु भाषिक लोक मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. मुस्लिम लोकही शहरात मध्ययुगीन काळापासून स्थायिक झालेले आहेत. अशा विविध धर्मीय आणि पंथीयांचा भरणा असलेल्या या शहरात अनेक महत्त्वाची धार्मिक व ऐतिहासिक ठिकाणे आहेत. सिध्देश्वर तलाव, भूईकोट किल्ला, कंबर तलाव, कुंभार कन्येचा वाडा, देशमुख वाडा, द्वारकानाथ कोटणीस स्मारक, इंद्रभुवन इत्यादींचा त्यात समावेश होतो. सिध्देश्वरांनी आपल्या हजारो भक्तांना बरोबर घेऊन एक मोठ्या तलावाची निर्मिती केली. त्यातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाल्याने शहराच्या वाढीस हे एक कारण कारणीभूत ठरले. मध्यकाळाच्या सुरूवातीस सिध्देश्वरांनी सर्वधर्मिय लोकांचे सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करून सर्वधर्म सहिष्णुवृत्तीचा पायडांच घातलेला होता असे दिसून येते.

शहराच्या सौंदर्यात भर घालणारी इंद्रभुवन ही इमारत आप्पासाहेब वारदांनी निर्माण केली. ही इमारत शहरातील वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. भारत आणि चीनमध्ये मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणारे डॉ. द्वारकानाथ कोटणीसांचे भव्य स्मारक शहराच्या पश्चिमेकडील भागात असून आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून अभ्यासकांच्या व पर्यटकांच्या दृष्टीने हे स्मारक महत्त्वाचे मानले जाते.

शहरातील धार्मिक जीवनात सर्व धर्मियांचे अस्तित्त्व असले तरी त्यांची उभारणी ही ईश्वराच्या संकल्पनेतूनच झाल्याचे दिसून येते. सामाजिक जीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान असल्याने आणि धर्माचा आधारही ईश्वरच असल्याने प्रत्येक धर्मियांनी ईश्वराचे अस्तित्त्व मान्य केले आहे. हाच धर्म मानवी वर्तनाला मार्गदर्शन करतो आणि त्याग, प्रेम, ज्ञान, दान यासारख्या उच्च मूल्यांचेही रक्षण करतो. विविध पंथीयाचे उपासक व उपासना पध्दती वेगवेगळ्या असल्या तरी अंतिम ध्येय हे परमेश्वर प्राप्तीच असते, हे अभ्यासांती दिसून आले. शहरातील विविध धर्म व पंथीयांच्या धर्मसंघटना निर्माण होऊन त्याच्या आश्रयाने मठ, आश्रम, देवालये चालविली जाऊ

लागली आहेत. या धर्मसंघटना आपल्या धार्मिक स्थळांच्या माध्यमातून कलेचे, साहित्याचे, शिक्षणाचे, विचारांचे अभिसरण घडवून आणत आहेत.

माणसाच्या जीवनात देवालयाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. माणसाच्या मनात असणाऱ्या अलौकिक शक्तीचे मूर्त स्वरूप म्हणजे देव होय. अशा देवतेची पूजा-अर्चा करून मनुष्य आपले हित साधताना दिसून येतो. ईश्वरोपसनेसाठी माणसानी मंदिर, मशिद, गुरूद्वार, चर्च इत्यादी धर्म स्थळांची निर्मिती केली. मध्ययुगीन कालखंडातील धर्म स्थळांबरोबर अलिकडील काळात काही नवीन धार्मिक स्थळेही शहरात निर्माण झालेली आहेत. शहरात स्थापन झालेल्या व्यंकटेश व कालिका मंदिरांची वैशिष्ट्ये पाहिली असता मूळ ठिकाणी असणाऱ्या वैशिष्ट्यांची पुनरावृत्ती येथे आढळून येते.

शहरात हिंदु मंदिरात मंदिराची रचना, मूर्तीचे स्वरूप, उत्सव, नित्यनैमित्तिक पूजा या मूळ देवस्थान प्रमाणेच असल्याचे आढळून आले. मंदिर रचनेत गर्भगृह, सभा मंडप, अंतराळ व शिखर अशी पारंपारिक रचना पाहावयास मिळते. मंदिरातील मूर्ती या पाषाणाच्या, धातूच्या आणि वालुकामय स्वरूपातील असून लोकदेवताच्या मूर्ती या प्रतिकात्मक पाषाणाकृती आढळून आल्या आहेत. शिवलिंगे ही पितळ व चांदीच्या आवरणांनीयुक्ती असून त्यावर प्रस्थापित देवतेच्या चांदी किंवा पितळेचे मुखवटे बसविलेले आढळतात.

मुस्लिमांच्या धार्मिक स्थळांतून इस्लामी परंपरा जपण्याचा प्रयत्न होत आहे. मशिदी, दर्गे, ईदगाहमधून अदा होणाऱ्या नमाजाच्या माध्यमातून ईश्वराची उपासना केली जाते. यामध्ये इमामाची महत्त्वाची भूमिका असते. मशिदी या चौरसाकृती किंवा आयताकृती असून त्यामध्ये सहन, वजू करण्यासाठी पाण्याचा हौद, मेहराब, मिबंर, लिबान, रिबाक, उंच मिनार असे घटक आहेत. काही मशिदीतून धार्मिक शिक्षण देणाऱ्या मदरसा, मक्तब आणि तालिम आढळून आल्या. या धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने इस्लामी संस्कृतीचा वारसा शहरात टिकून राहिला आहे.

शहरात मराठी भाषा बोलणारे कानडी व तेलगु भाषा जाणतात, तर कानडी व तेलगु बोलणाऱ्यांना चांगल्या प्रकारे मराठी भाषा अवगत आहे. एवढेच नव्हे तर आचार, विचार, पोशाख, राहणीमान, चालीरिती, खाद्यपदार्थ इत्यादी घटकांचा परस्परांवरही प्रभाव जाणवतो. शहरात साजरे होणारे सण, उत्सव व देव-देवतांच्या यात्रा यामध्ये आंध्र व कर्नाटकमधील हजारो भाविक सामील होतात. सिध्देश्वराची गड्डा यात्रा, मार्कंडेय रथयात्रा, श्रावणातील माल्लिकार्जून व रेवणसिध्देश्वर

यात्रा व नवरात्रातील रूपाभवानीची यात्रा इत्यादी यात्रेच्या प्रसंगी अनेक भाविक सोलापूर शहरात येतात. शहरातील हजारो भक्त कर्नाटकातील गाणगापूर येथील दत्त मंदिरास व आंध्रातील तिरूपतीच्या बालाजीच्या दर्शनासाठी जातात. त्यातूनच महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील मराठी, कानडी व तेलगु संस्कृतीची देवाण-घेवाण होऊन संस्कृती समन्वय झाल्याचे दिसून आले.

शहरातील जैन मंदिरे ही स्थापत्यकलेच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची वाटतात. जुनी मंदिरे ही दगडी बांधकामातील असून अलिकडील काळात निर्माण झालेली जैन मंदिरे संगमरवरी बांधकामातील आहेत. फक्त दिगंबरपंथीय मंदिरासमोरच मानस्तंभ दिसून येतो. प्रत्येक जैन मंदिराच्या शिखरात एक छोटेसे मंदिर असून त्यात एका जिनमुर्तीची स्थापना केलेली आढळले.

बुध्द विहारात बुध्द मूर्ती असून तेथे बुध्दवंदना केली जाते तर चर्चसमधून दर रविवारी प्रभु येशूची सामुहिक प्रार्थना होते. अग्यारी व गुरूद्वारा ही धार्मिक स्थळे कमी प्रमाणात आढळून आली. पारशी धर्मीयांचे धर्मस्थळ अग्यारीमधून बाराही महिने दिप तेवत ठेवलेला असतो तर गुरूद्वारात दररोज 'गुरूग्रंथ साहेब' या ग्रंथाचे पठण होते.

शहरातील ही धार्मिक स्थळे धार्मिक व सांस्कृतिक वारसांची प्रतिके आहेत. काळाच्या ओघात भाषिक आणि प्रांतीय संस्कृती विकसित होत गेल्याने देव-देवतांच्या बाबतीत भिन्नता असूनही या देव-देवतांचा प्रभाव शहरावर टिकून राहिला आहे. शहरातील धार्मिक स्थळांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, लोक अनेक देव-देवतांची उपासना व भक्ती करतात. विविध देवतांच्या होणाऱ्या यात्रा, उत्सवात सहभागी होऊन एकात्मतेचे दर्शन घडवितात. प्राचीन काळापासून चालत आलेल्या चालीरिती, रूढी-परंपरा, व्रत्ते, सण, उत्सव, संस्कार पध्दती, लोकभ्रमातील दृष्टीबाधा, भूतबाधा, देवाचे सामर्थ्य, भविष्य विषयाची जिज्ञासा, विश्वास, शकून-अपशकून कल्पना, अवतारी पुरूषावरील श्रध्दा इत्यादी बाबी कमी अधिक प्रमाणात जशाच्या तशा सोलापूर शहरात प्रचलित असल्याचे दिसून आले.

२१ वे शतक हे विज्ञानाचे युग असल्याने माणसाचे बाह्य जीवन हे विज्ञानाभिमुख बनले असले तरी धार्मिक स्थळांमुळे अंतर्गत जीवनात परंपरागत धर्म भावनेचे प्रभावी संस्कार खोलवर रूजलेले आहेत. ही धार्मिक स्थळे पवित्र आणि मंगल असल्याने माणसाच्या मनात देवालयाबद्दल

आदर व सद्‌भावना निर्माण झाली आहे. ही देवालये मानवतावादाची केंद्रे मानल्याने देवालयांनी सांस्कृतिक, सामाजिक, नैतिक आणि आर्थिक क्षेत्रात केलेले कार्य महत्त्वाचे वाटते.

"सोलापूर शहरातील धार्मिक स्थळांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास" या संशोधन विषयामध्ये सर्वच पैलूंवर प्रकाश टाकणे शक्य नसल्याने अशा पैलूंवर संशोधन होणे आवश्यक आहे. उदा. महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवरील सामाजिक, सांसकृतिक व भषिक समन्वय, मराठी-कानडी-तेलगु अनुबंध, विविध कालखंडातील मंदिर स्थापत्य, निरनिराळ्या धार्मिक स्थळांचा स्वतंत्र अभ्यास, विविध धार्मिक स्थळांचा स्थापत्यकलेचा अभ्यास, शहरातील लोकदैवते, निरनिराळ्या रोगांच्या देवतांचा अभ्यास, धर्मवार धार्मिक स्थळांचा अभ्यास अशा स्वतंत्र विषयातून या विविध पैलूंवर प्रकाश टाकता येतो.

## सूचना

१) शहरातील महत्त्वाच्या ऐतिहासिक व धार्मिक ठिकाणांची देखभाल व व्यवस्था चांगल्या स्वरूपात ठेवली गेली तर हा ऐतिहासिक ठेवा जपण्याबरोबरच सोलापूर शहराच्या पर्यटनास महत्त्व प्राप्त होऊन आर्थिक विकासास हातभार लागेल.

२) सिध्देश्वर तलाव, हिप्परगा तलाव व कंबर तलावाच्या बाजूने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करुन कायम स्वच्छता ठेवल्यास शहराचे सौंदर्य तर वाढेलच प्रदूषणही होणार नाही. त्याचबरोबर शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

३) धार्मिक स्थळांमधून होणा-या कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त लोकांचा सहभाग वाढावा यासाठी प्रसारमध्यमांचा जाहिरातीसाठी वापर करावा.

४) धार्मिक स्थळांमधून चालविल्या जाणाऱ्या पाठशाळा व मदरसातून दर्जेदार शिक्षण दिले जावे.

५) धार्मिक स्थळांना मिळालेल्या देणग्यांची यादी, बांधकाम खर्च, मूर्तीची प्रतिष्ठापना, जीर्णोध्दार आणि रजिस्टर नंबर तेथील फलकावर लावण्यात यावा. जेणेकरून लोकांना धार्मिक स्थळांची सर्व माहिती मिळण्यास मदत होईल.

६) धार्मिक सण व उत्सवाच्या प्रसंगी लोकांकडून मिळालेल्या देणग्यांचा योग्य विनिमय करून तो समाज प्रबोधनासाठी खर्च करण्यात यावा.

७) धार्मिक स्थळांमध्ये स्वच्छता ठेवून त्यांचे पावित्र्य राखले जावे व स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा यासाठी देवालयामार्फत सेवक वर्ग नेमावा.

८) धार्मिक स्थळांची बांधकामे सरकारी परवाागीशिवाय करू नयेत. ही धार्मिक स्थळे गावाच्या बाहेर असावीत त्याठिकाणी वाहन तळाची व्यवस्था करावी.

९) सार्वजनिक ठिकाणी होणारे उत्सवाचे मंडप रस्त्याच्या मधोमध न घालता ते एका बाजूस रहदारीस अडथळा होणार नाही अशा ठिकाणी घालावेत.

१०) धार्मिक देव-देवतांच्या यात्रा, सण व उत्सवाच्या प्रसंगी मिरवणूकीवेळी रस्त्यावर अडथळा होईल असे वर्तन लोकांनी करू नये.

११) धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी महाराष्ट्र व परराज्यातून येणाऱ्या भक्तगणांना राहण्यासाठी शहरात यात्री निवासाची व्यवस्था करण्यात यावी यासाठी मंदिर संस्थेने व महानगरपालिके-ने योगदान द्यावे.

१२) धार्मिक स्थळांमध्ये विविध धर्मियांचे धार्मिक ग्रंथ ठेवून त्याची पारायणे करावीत.

१३) देवस्थानपंचकमिटीच्या माध्यमातून धार्मिक स्थळांच्याद्वारे सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करावेत. जेणेकरून गरीब लोकांना याचा लाभ घेता येईल.

१४) यात्रेकरू व गोरगरीबांसाठी धार्मिक स्थळांच्या माध्यमातून अन्नछत्र चालवावीत.